निशाणी क्र. २३

## सरकारतर्फे साक्षीदार क्र. ४ (PW–4) यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की,

नाव – नंदाबाई देवकृष्ण ढगे

वय – ५५ वर्षे, व्यवसाय – शेतीकाम,

राहणार – नारायणपूर, तालुका नांदुरा, जिल्हा बुलढाणा

– – – – –

## सरतपास – सरकारी अभियोक्ता श्री.व्ही एम बापट यांच्यामार्फत

१. विष्णू आत्माराम खैरे आणि वर्षा विष्णू खैरे यांना मी ओळखते. ते माझ्या घराच्या लांब राहत होते. त्यांच्या व माझ्या घरामध्ये तीन घरे आहेत. वर्षाबाई जिवंत नाही. तिला तीन मुले आणि एक मुलगी आहे. मुले लहान लहान होती. वर्षा कशाने वारली ते मला माहिती नाही. मी शेतात गेले होते. असे काही झाले नाही की विष्णूने वर्षाला मारले. पोलीस संध्याकाळी मला दिसले होते. पोलिसांनी मला विचारपूस केली नव्हती.

(भारतीय पुरावा अधिनियम कलम १५४ मधील तरतुदीनुसार साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याने उलट तपासात विचारता येतील असे प्रश्न विचारण्याची परवानगी शासकीय अभियोक्ता यांच्या विनंतीवरून देण्यात आली.)

२. हे खरे नाही की विष्णू हा वर्षाला नेहमी पाप लावत होता आणि तिच्यावर तो संशय घेत होता. विष्णू हा वर्षाला मारहाण करत असे हे मला माहिती नाही. हे खरे नाही की विष्णूच्या घरी आरडाओरडा झाला तर माझ्या घरी तो ऐकू

येतो. हे खरे नाही की विष्णू हा वर्षाला मारहाण करत असे तेव्हा मी जायचे आणि तिला सोडवायचे. आता मला पोलीस जबाबातील अधोरेखित भाग "अ" वाचून दाखविण्यात आला. तो खरा नाही. तो मी पोलिसांना सांगितलं नाही. तो पोलीस सोबत का आला ते मी सांगू शकत नाही.

३. हे खरे नाही की दिनांक २८/०५/२०२१ रोजी दुपारी बाराच्या सुमारास विष्णू हा वर्षा हिला मारहाण करू लागला होता. आता मला पोलीस जबाबातील अधोरेखित भाग "ब" वाचून दाखविण्यात आला. तो खरा नाही. तो मी पोलिसांना सांगितलं नाही. तो पोलीस सोबत का आला ते मी सांगू शकत नाही. हे खरे आहे की सन २०२१ मध्ये कोरोना होता. हे खरे आहे की त्यावेळी लॉकडाऊन होते. हे खरे नाही की त्या दिवशी विष्णू वर्षाला मारहाण करत असताना मी सोडवण्यासाठी गेले तेव्हा त्याने मला लाथ मारली.

४. हे खरे नाही की वर्षा हिला विष्णू हा आतील खोलीत मारहाण करीत होता. हे खरे नाही की वर्षा हिचे केस मोकळे होते व ती घामा झोकीत झाली होती. हे खरे नाही की ती माझ्याकडे पाहून रडत होती आणि विष्णू हा तिच्या पाठीत पोटात तोंडात लाथा बुक्क्यांनी मारहाण करीत होता. हे खरे नाही की मी विष्णू याला म्हणाले की तिले दिवस आहेत ती मेली तर या लेकराचे कसे होईल. हे खरे नाही की त्यावर विष्णूने मला जोरात ओरडून तू तुझ्या घरी जाय असे म्हटले व घरातून काढून दिले. हे खरे नाही की त्याने वर्षा हिचे केस पकडून तिला हाताने पिळा देऊन तिचे डोके जोरात पलंगावर आपटले. मी घरी जाण्यास निघाली तेव्हा आत्माराम आबा यांना सांगितले की विष्णू माझे ऐकत नाही. आता मला पोलीस जबाबातील अधोरेखित भाग "क" वाचून दाखविण्यात आला. तो खरा नाही. तो मी

पोलिसांना सांगितलं नाही. तो पोलीस जबाबात का लिहीला ते मी सांगू शकत नाही. हे खरे नाही की आरोपीला वाचवण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. जे. डी. तायडे यांच्यामार्फत</u>**

उलटतपास नाकारला.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2025.03.01 17:36:49 +0530

मलकापूर. **(सं.वि. जाधव)**
दिनांक – ०१/०३/२०२५. अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
मलकापूर.

वाचून दाखविले, बरोबर आहे असे साक्षीदाराने सांगितले. (साक्षीपुरावा केवळ मराठी भाषेत १६.४० वाजता सुरु करुन १६.५७ वाजेपर्यंत नोंदविण्यात आला.)

Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2025.03.01 17:36:53 +0530

मलकापूर. **(सं.वि. जाधव)**
दिनांक – ०१/०३/२०२५. अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
मलकापूर.

साक्षीपुराव्याची प्रत मिळाली.

| | |
|---|---|
| सरकारी अभियोक्तांची सही | |
| साक्षीदाराची सही/अंगठा | |
| आरोपींच्या वकीलांची सही | |